# प्रसिद्धीपत्रक

## महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटेट) - २०१९

## अंतरिम(तात्पुरती) उत्तरसूची

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत रविवार दिनांक १९ जानेवारी २०२० रोजी घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षा पेपर क्र.१ व पेपर क्र.२ ची अंतरिम (तात्पुरती) उत्तरसूची प्रसिद्ध करण्यात येत आहे.

या परीक्षेच्या पेपर क्र.१ व पेपर क्र.२ बाबत प्रश्नपत्रिकेतील कोणत्याही प्रश्नाबाबत किंवा पर्यायी उत्तराबाबत त्रुटी/आक्षेप असल्यास ते परीक्षा परिषदेकडे दिनांक १०/०२/२०२० अखेरपर्यंत पाठविता येतील. सदर आक्षेप/त्रुटी बाबतचे निवेदन http://mahatet.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आक्षेप नोंदणी या लिंकद्वारे परिषदेकडे पाठविता येतील. आक्षेपाबाबत लेखी निवेदन समक्ष/टपालाने/ईमेलद्वारे पाठविल्यास त्यांचा विचार केला जाणार नाही.

विहित मुदतीत ऑनलाईनरित्या प्राप्त झालेल्या आक्षेपांचा विचार करुन विषय तज्ज्ञांच्या अभिप्रायानुसार अंतिम उत्तरसूची यथावकाश प्रसिद्ध करण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(तुकाराम सुपे)

पुणे, दिनांक : ०१/ ०२/२०२०

आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे.